IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
IJARSCT
Impact Factor: 5.731
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Volume 2, Issue 2, February 2021

# कोविड–19 आणि शैक्षणिक मानसिकता

**डॉ. प्रविण कोहळे**

मुंदाफळे समाजकार्य महाविद्यालय, नरखेड

pravinkohale67@gmail.com

**प्रस्तावनाः**

जानेवारी 2020 रोजी भारतातील पहिला रूग्ण हा केरळमध्ये आढळला. हा रूग्ण चीनच्या उहानमधून आला होता. भारतात कोरोना व्हायरसचे आगमन आल्याने संपर्ण देश केरळकडे पाहात होता. पण केरळ सरकार जागे झाले आणि पुढचे तीन महिने सतर्क राहून आणि नियोजनबध्द उपाययोजना केल्या. एकवेळ अशी होती की केरळ राज्य कोरोना रूग्णांच्या संख्येच्या बाबतीत देशात दुसऱ्या क्रमांकावर होते. पण महिनाभरात कठोर उपाययोजनांमुळे केरळमध्ये रूग्णांची संख्या 400 च्या आत रोखण्यात सरकारला यश आल.

महाराष्ट्रातील कोरोना विषाणूचा उद्रेक 9 मार्च 2020 रोजी सुरू झाला. या दिवशी भारताच्या महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे होणाऱ्या साथीच्या आजाराची पहिली नोंद झाली. 17 मार्च 2020 रोजी महाराष्ट्रात पहिल्या कोरोना बाधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद झाली. महाराष्ट्र हे देशातील कोरानाचा सर्वाधिक प्रभाव झालेले राज्य आहे.राज्यात 3 मे 2020 पर्यंत 12,974 जणांना याची लागण झाली असून त्यापैकी 548 जणांचा मृत्यु झाला आहे आणि 2,115 जण पुर्ण बरे झालेले आहेत. एकुण संसर्ग झालेल्या रोग्यांपैकी 4ःलोकांचा मृत्यू झाला आहे.

महाराष्ट्र राज्यातील दोन तृतीयांशपेक्षा जास्त रूग्ण मुंबई महानगर भागातून (एमएमआर) आढळून आलेले आहेत. एमएमआर मुंबई, पुणे जिल्ह्याचा पट्टा हा देशातील कोरोना व्हायरस प्रादुर्भावासाठीच्या 10 ''हॉटस्पॉट'' पैकी एक बनला आहे. 14 एप्रिल पर्यंतच्या आकडेवारीनुसार भारतातील एकुण रूग्णांपैकी एकटया महाराष्ट्रात 23 ः रूग्ण असून एकुण मृत्यूपैकी 46ः लोकांचा मृत्यू झाला आहे.